मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# वीजग्राहकांकडे १२४ कोटी ७७ लाखांची थकबाकी!

## थकीत वीजबिल भरा अन् वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई टाळा

। पिंपरी-चिंचवड।
न्यूज एक्सप्रेस मराठी।




पुणे परिमंडलातील पिंपरी-चिंचवड, पुणे ग्रामीण मधील ५ लाख ८७ हजार २८६ घरगुती, वाणिज्यिक व औद्योगिक वीजग्राहकांकडे अद्यापही १२४ कोटी ७७ लाख रुपयांची थकबाकी ( झळाॲॅळ) आहे. त्यामुळे नाईलाजास्तव गेल्या २० दिवसांमध्ये १८ हजार ९५२ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. ही मोहिम आणखी तीव्र करण्यात येत असल्याने थकीत वीजबिलांचा ताबडतोब भरणा करावा असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे. महावितरणची संपूर्ण आर्थिक मदार ग्राहकांकडील वीजबिलांच्या दरमहा वसूलीवरच आहे. वीजबिलांच्या वसूलीमधूनच वीजखरेदीसह विविध देणी दरमहा द्यावी लागतात. त्यामुळे थकीत वीजबिलांच्या वसूलीला मोठा वेग देण्यात आला आहे. थकबाकीमुळे वीजपुरवठा खंडित करणे व खंडित केलेल्या वीजजोडण्यांची तपासणी करण्यासाठी सर्व अधीक्षक अभियंते कार्यकारी अभियंते व इतर अधिकारी, कर्मचारी सध्या 'ऑन फिल्ड' आहेत. स्वतः मुख्य अभियंता राजेंद्र पवार परिमंडलात विविध ठिकाणी दौरे करून शाखा कार्यालयांपर्यंत थकबाकी वसूलीचा आढावा घेत आहेत.पुणे शहरात एकूण २ लाख ५४ हजार ९११ वीजग्राहकांकडे ४६ कोटी ६३ लाख रुपयांची थकबाकी आहे. यामध्ये घरगुती २ लाख १७ हजार ६२५ ग्राहकांकडे ३२ कोटी ३२ लाख रुपये, वाणिज्यिक ३४ हजार ८६९ ग्राहकांकडे ११ कोटी ६४ लाख रुपये, औद्योगिक २ हजार ४१७ ग्राहकांकडे २ लाख ६७ हजार रुपयांची थकबाकी आहे. गेल्या २० दिवसांमध्ये ९ हजार ७२६ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. पिंपरी-चिंचवड शहरात एकूण १ लाख ४५ हजार ६२२ वीजग्राहकांकडे ३२ कोटी २० लाख रुपयांची थकबाकी आहे. यामध्ये घरगुती १ लाख २३ हजार ४८६ ग्राहकांकडे १९ कोटी ९३ लाख रुपये, वाणिज्यिक १८ हजार ४९१ ग्राहकांकडे ८ कोटी २८ लाख रुपये, औद्योगिक ३ हजार ६४५ ग्राहकांकडे ३ कोटी ९९ लाख रुपयांची थकबाकी आहे. गेल्या २० दिवसांमध्ये ४ हजार ५३९ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. तसेच ग्रामीण भागातील आंबेगाव, जुन्नर, मावळ, खेड, मुळशी, वेल्हे, हवेली तालुक्यांमध्ये एकूण १ लाख ८६ हजार ७५३ वीजग्राहकांकडे ४५ कोटी ९४ लाख रुपयांची थकबाकी आहे. यामध्ये घरगुती १ लाख ६७ हजार १७ ग्राहकांकडे ३२ कोटी ८७ लाख रुपये, वाणिज्यिक १७ हजार ३१३ ग्राहकांकडे ८ कोटी ५९ लाख रुपये, औद्योगिक २ हजार ४२३ ग्राहकांकडे ४ कोटी ४८ लाख रुपयांची थकबाकी आहे. तर ४ हजार ६८७ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. वीजग्राहकांनी थकबाकीचा त्वरीत भरणा करावा व वीजपुरवठा खंडित करण्याची कटू कारवाई टाळावी असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे. वीजग्राहकांना चालू व थकीत वीजबिलांचा भरणा करणे सोयीचे ( झळाॲॅळ) व्हावे यासाठी पुणे परिमंडलातील महावितरणचे सर्व अधिकृत वीजबिल भरणा केंद्र शनिवारी (दि. २३) व रविवारी (दि. २४) सार्वजनिक सुटीच्या दिवशी कार्यालयीन वेळेत सुरु राहणार आहे. सोबतच लघुदाब वीजग्राहकांना बिलांचा घरबसल्या भरणा करण्यासाठी महावितरणच्या ारहरवळीलो.ळॅप वेबसाईट व मोबाईल ॲपद्वारे 'ऑनलाईन' सोय उपलब्ध आहे.

# पुरणपोळी होळीत न टाकता तिचे दान करा!

## नागरिकांनी पर्यावरणपूरक होळी साजरी करावी

। पिंपरी-चिंचवड।




नागरिकांनी पर्यावरणपूरक होळी साजरी करावी व पुरणपोळी होळीत न टाकता तिचे दान गरिबांमध्ये करावे, असे आवाहन अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पिंपरी चिंचवड शाखेच्यावतीने करण्यात आले आहे. गेल्या पंचवीस वर्षांपासून देहूरोड, बिजलीनगर, चिंचवड या भागात होळीला नैवेद्य म्हणून वाहण्यात येणारी पुरणपोळी व नारळ यांचे संकलन करून देहूरोडमधीलच गरीब वस्तीत वाटपाचे काम ग्रामस्थांच्या सहकार्याने करण्यात येते. शहरातील इतर भागातील नागरिकांनी त्याचे अनुकरण करावे तसेच ज्यांना या उपक्रमात सहभागी व्हायचे आहे, त्यांनी रविवारी देहूगाव येथे संध्याकाळी ६ वाजता जमावे, असे आवाहनही अंनिसने पत्रकाद्वारे केले आहे.

# उष्माघाताचा धोका वाढला.. पिंपरी महापालिकेने केले 'हे' आवाहन..!

## शहरातील तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ

**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शहरातील तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे त्यामुळे उष्माघाताचा धोका वाढला आहे. त्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाकडून उष्माघात संबंधी शहरवासीयांनी घ्यावयाची दक्षता आणि उपाययोजना याबाबत आवाहन करण्यात आले.महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी यासंदर्भात आव्हान केले आहे. त्यांनी म्हटले आहे की, सर्वसाधारणपणे प्रत्येक वर्षी मार्च, एप्रिल, मे, जून या महिन्यामध्ये उष्माघाताचा प्रादुर्भाव होत असतो. सध्या हवामानातील बदल झालेला असून शहराचे तापमान खूप वाढत आहे. अशा परिस्थितीत उष्माघात होण्याची शक्यता असल्याने शहरवासीयांनी उष्माघातासारख्या जीवघेण्या परिस्थितीतून वाचण्यासाठी दक्षता घ्यावी. उन्हाळ्यात शारिरिक श्रम, मेहनतीचे, व मजुरीची कामे फार वेळ करणे. कारखान्याच्या बॉयलर रुममध्ये काम करणे, काच कारखान्यात काम करणे. जास्त तापमानाच्या खोलीत काम करणे, घट्ट कपड्यांचा वापर करणे. अशा प्रत्येक उष्णतेशी अथवा तापमानातील वाढत्या परिस्थितीशी सतत संबंध येण्याने उष्माघात होतो. मळमळ, उलटी, हात पायात गोळे येणे, थकवा येणे, ४० डिग्री सेल्सिअसपेक्षा जास्त ताप येणे, त्वचा गरम होणे व कोरडी पडणे, क्वचित लाल होणे, घाम न येणे, डिहायड्रेशन, चक्कर येणे, निरूत्साही वाटणे, डोके



दुखणे, छातीत धडधड होणे, रक्तदाब वाढणे, मानसिक अस्वस्थ, बेशुद्धावस्था आदी. गर्भवती महिला, बालके, लहान मुले, खेळाडू, सतत उन्हात काम करणारी व्यक्ती, वयस्कर, वृद्ध, ज्या व्यक्तींना बिपी , शुगर चे आजार, हृदयरोग, फुफुसाचे विकार, मूत्रपिंडाचे विकार, यकृताचे आजार, आजारी असणारे व्यक्ती. १. वाढत्या तापमानात कष्टाची कामे टाळावीत, शक्य असल्यास थोडा वेळ सावलीत विश्रांती घेऊन पुन्हा काम करावे, कष्टाची कामे सकाळी लवकर अथवा संध्याकाळी कमी तापमानात करावीत. २. उष्णता शोषून घेणारे काळ्या / गडद रंगाचे, तंग कपड्यांचा वापर टाळावेत. सैल पांढरे अथवा फिकट रंगाचे सुती कपडे वापरावेत. ३. तीव्र उन्हात बाहेर जाणे टाळावे, बाहेर प्रवासात जात असता पिण्याचे पाणी सोबत ठेवावे, ( शक्य असल्यास जठड चे पाणी वापरावे) धुम्रपान, मद्यपान, चहा, कॉफी, सॉफ्टड्रिंक्स टाळावेत. ४. पाणी भरपूर प्यावे, डीहायड्रेशन होऊ देऊ नये, लिंबू सरबत, लस्सी, ताक, नारळ पाणी, इत्यादी प्यावे. ५. उन्हात बाहेर जाताना, गॉगल्स, डोक्यावर टोपी, टॉवेल, फेटा,छत्री, इ चा वापर करावा. ६. पार्क केलेल्या वाहनामध्ये मुले किंवा पाळीव प्राण्यांना सोडू नये. ७. त्वचेवर घामोळे आल्यास क्रीम किंवा ऑइंटमेंट न वापरता पावडर वापरावे. ८. उष्माघाताची लक्षणे आढळल्यास त्वरित नजीकच्या मनपा आरोग्य केंद्र/ रुग्णालय अथवा खाजगी रुग्णालयाशी संपर्क करावे. २. हातपायाला गोळे आल्यास तेथील स्नायूला हलका मसाज द्या. थोडे थोडे पाणी प्यायला द्या. उलटी झाली तर पाणी देऊ नका. ३. रुग्णाला थंडजागी शक्यतो एसीमध्ये झोपवा, अंगावरील कपडे सैल करा, ओल्या, थंड फडक्याने अंग पुसत राहावे. थोडे थोडे पाणी पाजत रहा, उलटी होत असेल तर पाणी देऊ नका, दवाखान्यात हलवा. ४. रुग्णाला हवेशीर व थंड खोलीत हलवावे, त्वरित खोलीतील पंखे, कुलर्स, एसी सुरु करावे. ५. रुग्ण शुध्दीवर आल्यास त्यास थंड पाणी, जलसंजीवनी द्यावे, चहा, कॉफी देऊ नये. ६. रुग्णाच्या काखेखाली आईसपॅक ठेवावे, कपाळावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवाव्यात. उष्माघाताच्या रुग्णांवर वेळेवर उपाययोजना करणेसाठी जवळच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्र/ खाजगी रुग्णालयाशी संपर्क करावे. उष्माघाताच्या रुग्णावर उपचाराकामी आवश्यक मनुष्यबळ व औषधोपचार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये उपलब्ध आहे.

# त्रिवेणीनगरमध्ये मंडप साहित्याच्या गोडाऊनला भीषण आग

## गोदामतील सर्व साहित्य आगीत जळून खाक झाले...

**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** त्रिवेणीनगरमध्ये मंडप साहित्याच्या गोडाऊनला भीषण आग

तळवडे त्रिवेणीनगर येथील स्पाईन रस्ता येथे (दि. २१) रोजी दुपारी साडे तीनच्या सुमारास मंडप साहित्याच्या गोदामाला भीषण आग लागली. मंडपाचे



साहित्य असणाऱ्या गोडाऊनला ही आग लागली असून, सुदैव इतकंच की कोणतीही जिवीतहानी झालेली नाही. मात्र गोदामतील सर्व साहित्य आगीत जळून खाक झाले. अग्निशमन दलाचे दहा बंब घटनास्थळी असून अग्निशमन दलाला आग विझविण्यात यश आले आहे. अशी माहिती तळवडे येथीलउप अग्निशमन अधिकारी गौतम इंगवले यांनी दिली.

# देशात कापसाचे उत्पादन वाढणार?

## पाणी टंचाईमुळे राज्यातील डाळिंबाचा अंबिया बहर अडचणीत

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** कॉटन असोसिएशन ऑफ इंडियाने (सीएआय) २०२३-२४ च्या हंगामात देशातील कापूस उत्पादन ३०९ लाख गाठींवर गेल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. यापूर्वी २९४ लाख गाठींचा अंदाज होता. जागतिक बाजाराच्या तुलनेत देशात मिळणारा दर जास्त असल्यामुळे निर्यातही रोडावली आहे. सीएआयने आपल्या या पूर्वीच्या अंदाजात देशात २९४ लाख गाठींचे (१७० किलोची एक गाठ) उत्पादन होण्याचा अंदाज होता. आपल्या अंदाजात सुधारणा करून ३०९ लाख गाठींचे उत्पादन झाल्याचे म्हटले आहे. उत्पादनात वाढ झाली असली तरीही जगभरात असलेले मंदीचे वातावरण, इस्रायल-हमास युद्धामुळे सुएझ कालव्यातून बंद



असलेली वाहतूक, रशिया-युक्रेनमधील तणाव आणि जागतिक बाजाराच्या तुलनेत देशात मिळत असलेला चांगला दर या कारणांमुळे देशातून होणारी निर्यात रोडावली आहे. २०११ च्या सुमारास देशातून सुमारे ७० ते ८० लाख गाठींची निर्यात होत होती. मागील काही वर्षांत ही निर्यात ४२ लाख गाठींवर आली आहे. यंदा जेमतेम २० लाख गाठींची निर्यात होण्याचा अंदाज आहे. कापूस उद्योगाचे अभ्यासक विजय जावंधिया यांनी दिलेल्या माहितीनुसार, कापूस उत्पादनात वाढ होण्याच्या अंदाजामुळे देशातील कापूस दरात काहीशी घट झाली आहे. मागील आठवड्यात प्रति क्विंटल दर सरासरी साडेसात ते आठ हजार रुपयांवर गेले होते. त्यात काहीशी घट झाली आहे. पण, कापूस उत्पादनात वाढ झाली तरीही दुसरीकडे देशांतर्गत वापरात वाढ झाली आहे. त्यामुळे कापसाचे दर सरासरी आठ हजार क्विंटलवर स्थिर राहण्याचा अंदाज आहे. सीआयएने दिलेल्या माहितीनुसार फेब्रुवारीअखेर १५ लाख गाठींची निर्यात झाली होती, ती आता २० ते २२ लाख गाठींवर जाण्याचा अंदाज आहे. देशभरात कापसाचे उत्पादन वाढले तरीही मोसमी पावसातील खंडामुळे कापसाचा दर्जा घसरला आहे. कर्नाटक आणि विदर्भातील कापसापासून तयार केलेल्या धाग्याची ताण सहन करण्याची क्षमता कमी झाल्यामुळे सूतगिरण्यांकडून कापसाला मागणी घटली आहे. त्या तुलनेत मराठवाड्यातील नांदेड, परभणी, हिंगोली येथील कापसाचा दर्जा चांगला आहे. पण, शेतकरी मागील हंगामातील शिल्लक कापूस आणि या हंगामातील कापूस मिसळून विक्री करीत आहेत. त्यामुळे धाग्यांचा दर्जा घटत आहे, आपल्या अंदाजात सुधारणा करून ३०९ लाख गाठींचे उत्पादन झाल्याचे म्हटले आहे. उत्पादनात वाढ झाली असली तरीही जगभरात असलेले मंदीचे वातावरण, इस्रायल-हमास युद्धामुळे सुएझ कालव्यातून बंद असलेली वाहतूक, तणाव आणि जागतिक बाजाराच्या तुलनेत देशात मिळत असलेला चांगला दर या कारणांमुळे देशातून होणारी निर्यात रोडावली आहे.

**» २०११ च्या सुमारास देशातून सुमारे ७० ते ८० लाख गाठींची निर्यात होत होती. मागील काही वर्षांत ही निर्यात ४२ लाख गाठींवर आली आहे. यंदा जेमतेम २० लाख गाठींची निर्यात होण्याचा अंदाज आहे. कापूस उद्योगाचे अभ्यासक विजय जावंधिया यांनी दिलेल्या माहितीनुसार, कापूस उत्पादनात वाढ होण्याच्या अंदाजामुळे देशातील कापूस दरात काहीशी घट झाली आहे. मागील आठवड्यात प्रति क्विंटल दर सरासरी साडेसात ते आठ हजार रुपयांवर गेले होते. त्यात काहीशी घट झाली आहे. पण, कापूस उत्पादनात वाढ झाली तरीही दुसरीकडे देशांतर्गत वापरात वाढ झाली आहे. सीआयएने दिलेल्या माहितीनुसार फेब्रुवारीअखेर १५ लाख गाठींची निर्यात झाली होती, ती आता २० ते २२ लाख गाठींवर जाण्याचा अंदाज आहे. देशभरात कापसाचे उत्पादन वाढले तरीही मोसमी पावसातील खंडामुळे कापसाचा दर्जा घसरला आहे. कर्नाटक आणि विदर्भातील कापसापासून तयार केलेल्या धाग्याची ताण सहन करण्याची क्षमता कमी झाल्यामुळे सूतगिरण्यांकडून कापसाला मागणी घटली आहे.**

# भूखंड घोटाळ्यात खडसे कुटुंबीयांना दिलासा मिळाला

## एकनाथ खडसे यांच्यासह पत्नी आणि जावयाला जामीन

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** भोसरी येथील कथित भूखंड घोटाळा प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नेते आणि विधानपरिषदेचे आमदार एकनाथ खडसे यांच्यासह त्यांच्या पत्नी मंदाकिनी खडसे आणि जावई गिरीश चौधरी यांना अतिरिक्त सत्र न्यायाधीश पी. पी जाधव यांनी जामीन मंजूर केला. त्यामुळे खडसे कुटुंबीयांना दिलासा मिळाला आहे. राज्याचे महसूल मंत्री असताना एकनाथ खडसे यांच्या पत्नी मंदाकिनी खडसे आणि जावई गिरीश



चौधरी यांनी २०१६ मध्ये भोसरी एमआयडीसीमध्ये एक जमीन तीन कोटी ७५ लाख रुपयांना खरेदी केली केली होती. अब्बास उकानी हे या जमिनीचे मूळ मालक होते. नोंदणी निबंधकांच्या या व्यवहाराची कार्यालयात रीतसर नोंदणीही करण्यात आली. व्यवहारानुसार खडसे कुटुंबीय सरकारी नोंदणीप्रमाणे कागदोपत्री मालकही झाले. ही जमीन मूळ बाजारभावाच्या अगदी कमी किंमतीत खरेदी केल्याचा त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला होता. या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते हेमंत गावंडे यांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यामध्ये खडसे यांच्यासह त्यांची पत्नी मंदाकिनी आणि जावई गिरीश चौधरी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.या कथित भूखंड घोटाळा प्रकरणाचा तपास केल्यानंतर पोलिसांनी ११ ऑक्टोबर २०२३ रोजी आरोपींवर दोषारोपपत्र दाखल केले. दरम्यान, खडसे, मंदाकिनी खडसे आणि गिरीश चौधरी यांच्या मार्फत वकिलांनी न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला. मात्र, विशेष सरकारी वकील अजय मिसार यांनी त्यांच्या जामीन अर्जाला विरोध केला. आरोपींच्या वकिलांनी युक्तिवाद केला की यापूर्वी २४ नोव्हेंबर २०२३ ला खडसे यांच्यासह दोघांना अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला होता. आरोपींवर दोषारोपपत्र दाखल होण्या आधीच त्यांना अंतरिम जामीन मिळाला होता. अंतरिम जामीन मंजूर झाल्यावरही आरोपींनी कोणत्याही अटी शर्तींचे उल्लंघन केलेले नाही. अडथळा आणण्याचा प्रयत्न केलेला नाही. आजमितीला या प्रकरणाचा संपूर्ण तपास पूर्ण होऊन आरोपींवर दोषारोपपत्रदेखील दाखल झाले आहे. अशा परिस्थितीत आरोपींच्या पोलीस कोठडी किंवा न्यायालयीन कोठडीची गरज नाही.

# पुण्यात कार्यालयीन जागांना का वाढतेय मागणी?

## चालू वर्षात ७० लाख चौरस फुटांवर जाण्याची शक्यता



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुण्यातील रिअल इस्टेट क्षेत्रासाठी कार्यालय व औद्योगिक आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रांसाठी जागा भाडेतत्त्वाने घेण्यात यंदाचे वर्ष विक्रमी ठरण्याचा अंदाज मालमत्ता क्षेत्रातील सल्लागार संस्था सीबीआरई इंडियाने वर्तविला आहे. पुण्यातील कार्यालयीन जागा भाडेतत्त्वावर घेण्याचे व्यवहार चालू वर्षात ७० लाख चौरस फुटांवर जाण्याची शक्यता असून, हा गेल्या सहा वर्षांतील उच्चांक ठरेल, असेही नमूद करण्यात आले आहे. सीबीआरई इंडियाच्या अहवालानुसार, पुण्यातील भाडेतत्त्वावरील कार्यालयांचे क्षेत्र २०२४ मध्ये ७० लाख चौरस फुटांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. सध्या पुणे ही भारतातील सहावी सर्वांत मोठी कार्यालयीन बाजारपेठ आहे. गेल्या वर्षी पुण्यात भाडेतत्त्वावरील कार्यालयीन जागांचे क्षेत्र ६३ लाख चौरस फूट होते. विशेषतः शहराच्या औंध, बाणेर व विमाननगर अशा परिसरात कार्यालयीन जागांना अधिक मागणी आहे. या प्रत्येक परिसरात प्रत्येकी सुमारे १५ लाख चौरस फूट भाडेतत्त्वावरील कार्यालयांच्या जागा आहेत. प्रेस्टिज व सलारपुरिया यांसारख्या कंपन्या आणि मॅपल ट्रीसारख्या गुंतवणूकदार संस्थांनी या बाजारपेठेत प्रवेश केल्याने तिचा अधिक विस्तार होत आहे. पुण्यातील तंत्रकुशल मनुष्यबळ आणि स्पर्धात्मक बांधकाम क्षेत्र बाजारपेठ हे प्रमुख घटक माहिती-तंत्रज्ञान कंपन्यांसाठी फायद्याचे ठरले आहेत. यामुळे टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, इन्फोसिस, विप्रो व ॲक्सेंच्युअर अशा कंपन्यांनी पुण्यात कार्यालये स्थापन केली. या मोठ्या कंपन्यांच्या उपस्थितीमुळे पुण्यातील मालमत्ता क्षेत्राच्या वाढीला गती मिळत आहे. सातत्यपूर्ण पायाभूत विकास प्रकल्पांमुळेही या क्षेत्राला बळकटी मिळत आहे. चालू वर्षाच्या पहिल्या सहामाहीत भाडेतत्त्वावरील कार्यालयीन जागांची मागणी स्थिर राहण्याचा, तर दुसऱ्या सहामाहीत त्यात तेजी येण्याचा अंदाज आहे, असे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

> **“पुणे शहर हे मोक्याच्या ठिकाणी असल्याने त्याचे अनेक फायदे आहेत. त्याचबरोबर शहरातील उत्तम पायाभूत सुविधा या व्यवसायांसाठी पूरक ठरत आहेत. याचबरोबर कुशल मनुष्यबळाच्या उपलब्धतेमुळे कंपन्या पुण्यात कार्यालये स्थापन करीत आहेत. कार्यालयीन जागांमध्ये को-वर्किंग स्पेसचे प्रमाण वाढले असून, भविष्यात त्यात आणखी वाढ अपेक्षित आहे. - अंशुमन मॅक्झिन, अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, सीबीआरई इंडिया**

# पुण्यातील मेट्रोच्या विस्तारित मार्गांचे गाडे अडले

## हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गाचे काम पीपीपी तत्वावर सुरू

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शिवाजीनगर ते लोणीकाळभोर आणि रेसकोर्स ते स्वारगेट या विस्तारित मेट्रो मार्गांच्या व्यवहार्यता अहवाल पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) सादर करण्यात आला आहे. याच मार्गांचे काम करण्यास महामेट्रोही इच्छुक आहे. त्यामुळे या मार्गांचे काम कोण करणार असा तिढा आता निर्माण झाला आहे.

पीएमआरडीएकडून टाटा समूहासोबत हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो मार्गाचे काम पीपीपी तत्वावर सुरू आहे. या पुणेरी मेट्रो प्रकल्पाचा शिवाजीनगर ते लोणीकाळभोर आणि रेसकोर्स ते स्वारगेट असा विस्तार करण्याचे नियोजन आहे. पीएमआरडीएने या मार्गांचा प्रकल्प विकास आराखडा दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून तयार करून घेतला होता. याचवेळी महामेट्रोचा खडकवासला ते खराडी हा मार्ग प्रस्तावित आहे. त्यात खडकवासला ते स्वारगेट, स्वारगेट ते हडपसर, हडपसर ते खराडी आणि हडपसर ते लोणी काळभोर या टप्प्यांचा समावेश आहे. महामेट्रोने या मार्गाचा प्रकल्प विकास आराखडा खासगी सल्लागार संस्थेकडून तयार करून घेतला होता. दोन्ही संस्थांनी महापालिकेकडे हे प्रकल्प विकास आराखडे सादर केले होते.पीएमआरडीए आणि महामेट्रो यांच्याकडून दोन समान मार्गांवर मेट्रो उभारणीचे प्रकल्प विकास आराखडे सादर केले. त्यामुळे एकच संस्था या मार्गांचे काम करेल हे निश्चित करण्यात आले. हे मार्ग फायदेशीर ठरतील की नाही, हे तपासण्यासाठी पीएमआरडीएने सल्लागार नेमण्याचे पाऊल उचलले आहे. सल्लागारांच्या अहवालात सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर हे मार्ग व्यवहार्य असल्याचे म्हटले आहे. याबाबतचा अहवाल पीएमआरडीएकडून विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील पुणे एकीकृत महानगर परिवहन प्राधिकरणासमोर (पुमटा) नुकताच सादर करण्यात आला. विस्तारित मार्ग कोण करणार, याचा निर्णय विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील पुमटाकडून घेतला जाणार आहे. सुरुवातीला हे मार्ग पीपीपी तत्वावर व्यवहार्य नसल्याचे पीएमआरडीएचे म्हणणे होते. आता सल्लागार संस्थेने हे मार्ग व्यवहार्य असल्याचे म्हटले आहे. यामुळे पीएमआरडीएने या मार्गांचा विस्तार करण्याची तयारी दर्शविली आहे. याचवेळी महामेट्रोनेही या विस्तारित मार्गांचे काम करण्याची तयारी दर्शविली आहे. यामुळे पुमटाकडून यावर निर्णय होण्याची शक्यता आहे. महामेट्रोकडून ओव्हरहेड इक्विपमेंट प्रणालीचा वापर करण्यात आला आहे.